पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण यांचे कार्यालय,
चव्हाणनगर पाषाण रोड, पुणे -४११००८
दुरध्वनी क्रमांक-०२०-२५६५७८७८ फॅक्स क्रमांक-०२०-२५६७४६४१
ई मेल- sp.pune.r @mahapolice.gov.in.
(आस्थापना शाखा)

दिनांक : ०६/०८/२०२४

# -: उमेदवारांना सुचना :-

पुणे ग्रामीण पोलीस घटकातील पोलीस शिपाई संवर्गातील ४४८ रिक्त पदे भरण्यासाठी दिनांक ०९.०७.२०२४ ते १०.०८.२०२४ पावेतो शारीरीक मोजमाप व मैदानी चाचणी ची भर्ती प्रक्रिया पोलीस अधीक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण येथील पोलीस मुख्यालयाचे कवायत मैदानावर चालू असून सध्या अंतिम टप्प्यात आहे.

दिनांक ०९.०७.२०१४ ते ०९.०८.२०२४ या कालावधीत पावसामुळे, पुरपरिस्थितीमुळे व प्रासंगिक कारणांमुळे ज्या उमेदवारांची अदयापपर्यत या घटकातील पोलीस शिपाई पदाची मैदानी चाचणी झालेली नाही अशा उमेदवारांना शेवटची संधी/मुभा देण्याकरीता दिनांक ०९/०८/२०२४ रोजी सकाळी ०५.०० वा. महिला उमेदवार तसेच दिनांक १०/०८/२०२४ रोजी सकाळी ०५:०० वा. पुरुष उमेदवार यांनी पोलीस अधीक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण येथील पोलीस मुख्यालयाचे कवायत मैदान येथे आवेदन अर्ज, ज्या तारखेचे प्रवेशपत्र देण्यात आले होते ते प्रवेशपत्र व सर्व शैक्षणिक/सामाजिक/समांतर आरक्षणाचे सर्व वैध कागदपत्रांच्या स्थळप्रतीसह मैदानी चाचणीसाठी उपस्थित रहावे. शारीरीक मोजमाप, कागदपत्र पडताळणी व मैदानी चाचणीमध्ये अपात्र झालेल्या उमेदवारांनी उपस्थित राहू नये.

पोलीस शिपाई भरती-२०२२-२३ ची मैदानी चाचणी घेणेकरीता उमेदवारांना ही शेवटची संधी देण्यात येत असून वरिल दिनांका नंतर महिला व पुरुष उमेदवारांची शारीरीक मोजमाप व मैदानी चाचणी घेण्यात येणार नाही. याबाबत सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

( पंकज देशमुख ) भा.पो.से.
पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण.

G:\PC 2024\Police Bharti Letters 2024.Docx